# पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर

खारकर आळी, कळवा ब्रीज जवळ, ठाणे पश्चिम-४००६०१
(आस्थापना शाखा)
ई-मेल- cp.thane.sheetbr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/आस्था-2/7/पोभ-21/नियुक्ती/ 1606/2023 ठाणे शहर, दि. 27/05/2023

**संदर्भ** :- 1. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 दि.16.06.2011
2. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, 2016 दि.27.07.2016
3. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(पहिली सुधारणा) नियम, 2022 दि.23.06.2022
4. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(दुसरी सुधारणा) नियम, 2022 दि.20.10.2022
5. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(तिसरी सुधारणा) नियम, 2022 दि.03.11.2022

**विषय** :- **पोलीस शिपाई भरती - 2021**
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत..

*****

**आदेश** :-

पोलीस आयुक्त ठाणे शहर कार्यालयाचे आस्थापनेवर सन 2021 मध्ये रिक्त असलेल्या 521 पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यांत आली होती. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणीमध्ये गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमूद 17 **पुरुष व 04 महिला असे एकूण 21 उमेदवारांची "पोलीस शिपाई (गट-क)"** पदासाठी निवड झालेली आहे. सदर उमेदवार चारित्र्य पडताळणी, समांतर आरक्षण पडताळणी व वैद्यकीय तपासणीमध्ये **पोलीस शिपाई** पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

खालील नमूद 21 उमेदवारांची पोलीस आयुक्त ठाणे शहर कार्यालयाचे आस्थापनेवर **"पोलीस शिपाई (गट-क)"** या संवर्गात सातव्या वेतन आयोगातील सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-7 : रु.21,700-69,100/- व विशेष वेतन रु.750/- (अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते) या वेतन संरचनेतील रु.21,700/- या प्रारंभिक वेतनावर **पोलीस मुख्यालय, ठाणे शहर येथे दि.27/05/2023 पासून** खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत येत आहे.

| अ. क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नाव | पुरुष/महिला | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 17556 | अंकुश संतोष जाधव | पुरुष | विजा-अ | खुला | -- |
| 2 | 12672 | हानमंत बळीराम पांचाळ | पुरुष | भज-ब | भज-ब | पोलीस पाल्य |
| 3 | 15900 | अक्षय मोहन धायगुडे | पुरुष | भज-क | खुला | -- |
| 4 | 6611 | ओंकार मोहन धायगुडे | पुरुष | भज-क | खुला | -- |
| 5 | 8045 | वृषभ राजाराम पवार | पुरुष | इ.डब्ल्यु.एस | खुला | -- |
| 6 | 13490 | आकाश वसंत शिंदे | पुरुष | इ.मा.व. | खुला | -- |
| 7 | 18066 | सागर आजिनाथ सानप | पुरुष | भज-ड | खुला | प्रकल्पग्रस्त |
| 8 | 2679 | प्रसाद बिभिषण भोसले | पुरुष | इ.डब्ल्यु.एस | खुला | भूकंपग्रस्त |

..2/-

| अ. क्र. | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे नाव | पुरुष/महिला | जात प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8866 | हणमंत तायाप्पा मासाळ | पुरुष | भज-क | खुला | होमगार्ड |
| 10 | 14312 | जगदिश नवनाथ चव्हाण | पुरुष | अनु.जाती | अनु.जाती | -- |
| 11 | 12951 | निखिल सुभाष कांबळे | पुरुष | अनु.जाती | अनु.जाती | प्रकल्पग्रस्त |
| 12 | 4887 | हर्षद बापुराव चव्हाण | पुरुष | भज-ब | भज-ब | -- |
| 13 | 13500 | विशाल पोपट जाधव | पुरुष | भज-ब | भज-ब | -- |
| 14 | 8420 | दिपक पोपट विरकर | पुरुष | भज-क | भज-क | -- |
| 15 | 8863 | विशाल आनंदराव गोरड | पुरुष | भज-क | भज-क | -- |
| 16 | 23076 | कल्पेश नारायण मांजे | पुरुष | इ.माव. | इ.मा.व. | माजी सैनिक |
| 17 | 19182 | आसाराम बंडू तांगडे | पुरुष | इ.डब्ल्यु.एस | इ.डब्ल्यु.एस | प्रकल्पग्रस्त |
| 18 | 25205 | अश्विनी लक्ष्मण शेजवळ | महिला | इ.डब्ल्यु.एस | खुला | महिला |
| 19 | 27669 | काजल सोपान वाक्षे | महिला | भज-क | खुला | महिला |
| 20 | 28911 | स्मिता वसंत पाटील | महिला | इ.डब्ल्यु.एस | इ.डब्ल्यु.एस | महिला |
| 21 | 26470 | दिपाली कानिफनाथ शिंदे | महिला | इ.डब्ल्यु.एस | इ.डब्ल्यु.एस | महिला |

**-: अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-**

1) आपली नियुक्ती ही पूर्णत: हंगामी व तात्पुरत्या स्वरुपाची राहील, शासनास आपल्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगावू सूचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यांत येईल.

2) महाराष्ट्र शासन, सा.प्र.विभाग, शा.नि.क्र.बीसीसी 2011/प्र.क्र.1064/2011/16-ब, दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधिन राहून निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

3) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेवून जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात प्रमाणपत्र वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत आलेली असल्याने जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यांत येईल.

4) याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि.25.08.2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आलेली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहुन सदर नियुक्ती आदेश राहील.

5) पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात चारित्र्य पडताळणी अहवालासंदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. आपण समांतर आरक्षण लाभ घेण्यासाठी सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र भविष्यात खोटे असल्याचे आढळून आल्यास आपली सेवा कोणतेही कारण न देता तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

6) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यांत येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

7) प्रशिक्षण कालावधीत आपणांस कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा कोणतीही नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

8) प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. मुलभूत प्रशिक्षणानंतर पोलीस दलात उमेदवाराची पोलीस मुख्यालय व आवश्यकतेप्रमाणे इतरत्र विभागामध्ये/पोलीस स्टेशनमध्ये नेमणूक केली जाईल व सदरची नेमणूक त्यांच्यावर बंधनकारक राहील.

9) प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखवल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिका-यांच्या पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

10) ठाणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, त्यांची या घटकाचे कार्यक्षेत्रात इतर कोणत्याही ठिकाणी कोठेही व केव्हाही बदलीस पात्र होतील.

11) पोलीस शिपाई पदाची नियुक्ती स्विकारल्यानंतर राजीनामा दिल्यास पुन:र्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

12) ज्या संवर्गातून/जातीच्या प्रवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग/प्रवर्ग सेवाकालावधीत बदलता येणार नाही.

13) पोलीस शिपाई पदावर रुजु झाल्या तारखेपासून 3 महिन्यांचे आत उमेदवारांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.वशिअ-1214/प्र.क्र.26/11, दि.02.06.2014 नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र दरवर्षी स्वत:हून भरुन संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

14) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शा.नि.क्र.अनियो/1005/126/सेवा-4, दि.31.10.2005 अन्वये दि.01 नोव्हेंबर, 2005 किंवा त्यानंतर शासकीय सेवेत नियुक्त होणा-या उमेदवाराला **"नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना"** लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम 1982 व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984 आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

15) शासन निर्णय क्र.अकंपा/1000/प्र.क्र.20/2000/08, दिनांक 28.03.2001 अन्वये दि.31.12.2001 नंतर तिसरे अपत्य झालेल्या दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांस अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. तसेच पोलीस भरतीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांचे बाबतीत शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/बारा, दि.28.03.2005 व दि.01.07.2005 अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील नियम 4 नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि.28.03.2006 व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे सेवेत राहण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र टरतील याची नोंद घ्यावी.

16) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र.पीएसबी-311/प्र.क्र.521/पोल-5अ, दि.26.09.2011 व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि/खर्च/वसुली/2012/2231, दि.26.04.2012 अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर 3 वर्षात पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास किंवा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवारावर झालेला प्रशिक्षण कालावधीतील प्रशिक्षण खर्च प्रतिमहा रु.2000/- प्रमाणे वसुल करुन सरकार जमा करण्यांत येईल, याबाबतचे हमीपत्र उमेदवाराने देणे बंधनकारक राहील.

17) पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली 1951 भाग-1 मधील नियम क्र.78(1)(V) ते (VIII) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यांत येईल.

18) पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पुर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणास गैरहजर राहील्यास महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 भाग-1 मधील नियम क्र.78(1)(VIII) खालील टिप नुसार कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्यांत येईल.

19) महाराष्ट्र पोलीस शिपाई,(सेवाप्रवेश) नियम 2011 मधील नियम 12 अन्वये पोलीस शिपाई पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारास राज्यातील कोणत्याही पोलीस प्रशिक्षण केंद्रात आवश्यक असलेले मुलभुत प्रशिक्षण पूर्ण करुन संबंधित परीक्षा 04 संधींमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर 04 संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाली नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधित परीक्षा विहित संधीत उत्तीर्ण झाल्यास रोखून ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल, परंतु वेतनवाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

20) टाणे शहर पोलीस घटकात पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर अन्य पोलीस घटकांत आंतरजिल्हा बदलीसंदर्भात महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-1017/3843/प्र.क्र.469/पोल-5ब, दि.26.10.2017 अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

21) शासन पत्र, गृहविभाग, क्रमांक आरसीटी-0312/प्र.क्र.228/पुनर्बांधणी-166/पोल-5अ, दि.11/08/2016 अन्वये तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशिक्षण/पो.शि.भरती/ सेवाप्रवेश नियम-सुधारणा/36/2016/4391, दि.07/10/2016 अन्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 मधील नियम 3(1)(ड) मध्ये केलेल्या सुधारित तरतुदींनुसार पोलीस भरतीमध्ये

..5/-

पोलीस शिपाई पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 2(21) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आत परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल. जर एखादया उमेदवाराने चालक पोलीस शिपाई पदाचे कर्तव्य नाकारले तर त्यांचा कुठल्याही पदासाठी नियुक्तीचा हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती दिलेल्या सर्वच उमेदवारांना चालक प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना चालकाचे कर्तव्यसुध्दा करावे लागेल.

22) महाराष्ट्र पोलीस शिपाई, (सेवाप्रवेश) नियम 2011 मधील नियम 10 अन्वये पोलीस शिपाई पदावर नेमणूक दिलेल्या उमेदवाराला मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर मराठी व हिंदी भाषा परीक्षा त्याबाबतच्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

23) या आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम 1951, महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम 1956, महाराष्ट्र नागरी सेवा व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील. सदर नियमातील तरतुदीनुसार उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

24) उमेदवार कर्तव्यावर रुजु होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल.

25) नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणांस पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परीक्षा दयावयाची असल्यास त्या परीक्षेस बसणेसाठी अर्ज करणेपुर्वी त्यांनी या कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

26) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/6/10/पो.शि.भरती/सेवाजेष्ठता/251/2012, दि.17.08.2013 अन्वये स्थायी आदेश क्र.22/2013 मधील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता निश्चित करण्यांत येईल.

27) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39 दि.19.03.2003 नुसार गट-क पदावर नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील. शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंस 2012/प्र.क्र.277/39, दि.04.02.2013 मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक 86 प्रमाणपत्रांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक असावा. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील दि.28.05.2018 च्या अधिसूचनेतील महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, 2018 नुसार शासनाने विहित केलेल्या कालावधीत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवाराची वेतनवाढ, प्रमाणपत्र सादर करेपर्यंत किंवा प्रमाणपत्र सादर करण्यास सूट मिळेपर्यंत रोखून धरली जाईल. संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अगर सूट मिळाल्यानंतर, वेतनवाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

28) नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत अशा उमेदवारांनी त्यांच्या पुर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येईल.

29) महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-2018/व्ही.आय.पी.67/प्र.क्र.207/कार्या.12, दि.28.05.2018 व महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, 1982 मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत संबंधीत उमेदवारांनी नियुक्ती ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवाराकडून देण्यांत येणा-या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही याची नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(रुपाली अंबुरे)**
**पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-1**
**पोलीस आयुक्त ठाणे शहर करीता**

**प्रति,**

**संबंधित उमेदवार.**

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

1) **राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, ठाणे शहर.**

2/- उपरोक्त नमूद उमेदवार पोलीस मुख्यालय येथे हजर करुन घेवून त्यांची नोंद हजेरी पटावर घेवून उमेदवार हजर झाल्याची तारीख या कार्यालयास सादर करावी. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना आवश्यक तो सर्व किट सरंजाम किट पेटीसह अदा करुन त्यांना पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुढील मुलभूत प्रशिक्षणासाठी रवाना करेपर्यंत त्यांना पोलीस मुख्यालयात प्राथमिक प्रशिक्षण देण्यांत यावे. तसेच त्यांना एच.डी.एफ.सी. अथवा इतर राष्ट्रीयकृत बँकेत तात्काळ खाते उघडून खाते नंबर लेखा शाखेत सादर करण्याची समज द्यावी.

2) **कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा, ठाणे शहर.**

2/- शासन निर्णय क्र.अनियो/1005/126/सेवा-4, दि.31.10.2005 अन्वये दि.01.11.2005 नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने **नवप्रविष्ठ पोलीस शिपाई** यांचे नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेवून प्रचलित नियमांप्रमाणे वेतन व भत्त्यांची आकारणी करावी. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना मुलभूत प्रशिक्षणासाठी पाठविण्यांत येणार असल्याने सदरची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

**प्रत** :- 1) सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय, ठाणे शहर
2) आस्था-2/2
3) 9 ए.एस.पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी.